# ई - पोलीस पत्रिका

दि.०९/०६/२०२२ अनु. क्र.१०६

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू .

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण /रजा

१. **क्रमांक :- पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/अं.आ/नापोशि/१२५० भटकर +२/६२०७/ अमरावती शहर दिनांक - ०६/०६/२०२२**

**अंतिम आदेश**

**कसुरदाराचे नाव :-** **१) नापोशि/ १२५० रविन्द्र भटकर, पो.स्टे. बडनेरा, अमरावतीशहर,**
**२) नापोशि/१३६० शशीकांत शेळके, पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावतीशहर,**
**३) मपोशि/१३३३ संगीता फुसे, पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर,**

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही १) नापोशि/ १२५० रविन्द्र भटकर, पो.स्टे. फ्रेजरपूरा, २) नापोशि/१३६० शशीकांत शेळके, पो.स्टे. बडनेरा, येथे नेमणूकीस असून पो.स्टे. राजापेठ येथे हवालात गार्ड डयुटी कर्तव्यावर असतांना, तसेच ३) मपोशि/१३३३ संगीता फुसे, पो.स्टे. राजापेठ येथे नेमणूकीस असून दिनांक ०४/०८/२०२१ रोजी पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा येथे दाखल अप.क्र. १५४०/२०२१ कलम ३६३,३७६ (२) (एन) भादवी सहकलम ४, बालकांचे लैगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ मधील आरोपी नामे सागर श्रीपतराव ठाकरे वय २४ वर्षे, रा. खंबीत ता. आष्टी जि. वर्धा यास दिनांक १७/०८/२०२१ चे २१.३३ वा. साना क्र. ६४/२०२१ प्रमाणे अटक करुन पोलीस स्टेशन राजापेठ येथील हवालात मध्ये बंद करण्यांत आले होते. दिनांक १८/०८/२०२१ चे २१.०० वा. ते १९/०८/२०२१ रोजीचे ०८.०० वा. पावेतो सदर हवालातचे गार्ड डयुटी मध्ये १) सपोउपनि/२१९ मनोहर येवतकर पो.स्टे. नांदगांव पेठ, २) ना.पो.कॉ./१२५० रविंद्र भटकर पो.स्टे. बडनेरा, ३) ना.पो.कॉ./१३६० शशिकांत शेळके पो.स्टे. फ्रेजरपूरा, ४) पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ यांची डयुटी लावण्यात आली होती. त्यापैकी पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ यांची दिनांक १९/०८/२०२१ रोजीचे सकाळी ०६.०० ते ०८.०० वा. पावेतो संत्री पहारा सुरु होता.

पो.स्टे. राजापेठ येथे दिनांक १९/०८/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वा. दरम्यान हवालात गार्ड मधील ना.पो.कॉ./१२५० रविंद्र भटकर पो.स्टे. बडनेरा यांची साप्ताहिक रजा असल्याने ते सदर बाबत माहिती देण्यासाठी हवालात संत्री पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ यांचेकडे आले. त्यावेळेस हवालात मध्ये ना.पो.कॉ./१२५० रविंद्र भटकर व पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले यांनी पाहीले असता हवालात लॉकअपचे लोखंडी गेटला आतील बाजूने लाल रंगाच्या शर्टच्या सहाय्याने गळफास घेतलेला एक आरोपी दिसून आला. निट पाहील्यावर सदर आरोपी हा पो.स्टे. फ्रेजरपूरा अमरावती शहर येथील अप.क्र. १५४०/२०२१ कलम ३६३, ३७६ ३७ (२) (एन) भादवी सहकलम ४, पोक्सो चा पी.सी.आर. मधील आरोपी नामे सागर श्रीपतराव ठाकरे वय २४ वर्षे, रा. खंबीत ता. आष्टी जि. वर्धा हयाने गळफास घेवून आत्महत्या केल्याचे दिसून

आले. वरुन तात्काळ डी.ओ. पोउपनि गजानन काठेवाड यांना माहिती देण्यात आली. पोउपनि गजानन काठेवाड यांनी पो.स्टे. ला लॉकअप मध्ये पाहून इतर वरिष्ठ अधिकारी यांना सदरची माहिती दिली. सदर आत्महत्येची घटना सकाळी ०६.०० ते ०८.०० वा. पावेतो संत्री पहारा सुरु असतांना घडलेली आहे.

तुमच्या अशा कर्तव्यातील बेजबाबदारपणा व हलगर्जीपणाच्या कसूराबाबत विभागीय चौकशी मध्ये कसूर सिध्द झ ाल्याने तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **देय वार्षीक वेतनवाढ २ (दोन) वर्षाकरीता (कायम स्वरुपी) रोखण्याची शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.** सदरची नोटीस तुम्ही स्विकारुन त्यावर स्पष्टीकरण सादर केले. सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे बारकाईने अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटले नसल्याने तुम्हास दिनांक ०२/०६/२०२२ रोजी आज्ञांकित कक्षेत बोलावून तुमचे सविस्तर म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तुमचे मौखीक म्हणणे तसेच तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा सखोल विचार केला असता ते समाधानकारक वाटले नाही. परंतू तुम्हास पुढील कर्तव्यामध्ये सुधारण्याची एक संधी देण्यात येत असून प्रस्तावित कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशतः बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुरी प्रकरणी १) नापोशि/ १२५० रविन्द्र भटकर, पो.स्टे. फ्रेंजरपुरा, २) नापोशि/१३६० शशीकांत शेळके, पो.स्टे.बडनेरा, ३) मपोशि/१३३३ संगीता फुसे, पो.स्टे. राजापेठ यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **देय वार्षीक वेतनवाढ १(एक)वर्षाकरीता (परिणाम न होणारी) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.**

२ .पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/ अं.आ/पोशि/१६१४ प्रशांत इंगोले/६२०८/अमरावती दि.०६/०६/२०२२

## अंतिम आदेश

**कसुरदाराचे नाव :- पोशि/१६१४ प्रशांत इंगोले नेमणूक - पोलीस मुख्यालय, अमरावती शहर**

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोशि/१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ अमरावती, शहर. येथे नेमणूकीस असतांना दिनांक ०४/०८/२०२१ रोजी पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा येथे दाखल अप.क्र. १५४०/२०२१ कलम ३६३,३७६ (२) (एन) भादवी सहकलम ४, बालकांचे लैगीक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ मधील आरोपी नामे सागर श्रीपतराव ठाकरे वय २४ वर्षे, रा. खंबीत ता. आष्टी जि. वर्धा यास दिनांक १७/०८/२०२१ चे २१.३३ वा. साना क्र. ६४/२०२१ प्रमाणे अटक करुन पोलीस स्टेशन राजापेठ येथील हवालात मध्ये बंद करण्यांत आले होते. दिनांक १८/०८/२०२१ चे २१.०० वा. ते १९/०८/२०२१ रोजीचे ०८.०० वा. पावेतो सदर हवालातचे गार्ड डयुटी मध्ये १) सपोउपनि/२१९ मनोहर येवतकर पो.स्टे. नांदगांव पेठ, २) ना.पो.कॉ./१२५० रविंद्र भटकर पो.स्टे. बडनेरा, ३) ना.पो.कॉ./१३६० शशिकांत शेळके पो.स्टे. फ्रेजरपूरा, ४) पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे.

राजापेठ यांची डयुटी लावण्यात आली होती. त्यापैकी पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ यांची दिनांक १९/०८/२०२१ रोजीचे सकाळी ०६.०० ते ०८.०० वा. पावेतो संत्री पहारा सुरु होता.

दिनांक १९/०८/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वा. दरम्यान हवालात गार्ड मधील ना.पो.कॉ./१२५० रविंद्र भटकर पो.स्टे. बडनेरा यांची साप्ताहिक रजा असल्याने ते सदर बाबत माहिती देण्यासाठी हवालात संत्री पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ यांचेकडे आले. त्यावेळेस हवालात मध्ये ना.पो.कॉ./१२५० रविंद्र भटकर व पो.कॉ./१६१४ प्रशांत इंगोले यांनी पाहीले असता हवालात लॉकअपचे लोखंडी गेटला आतील बाजूने लाल रंगाच्या शर्टच्या सहाय्याने गळफास घेतलेला एक आरोपी दिसून आला. निट पाहील्यावर सदर आरोपी हा पो.स्टे. फ्रेजरपूरा अमरावती शहर येथील अप.क्र. १५४०/२०२१ कलम ३६३, ३७६ ३७ (२) (एन) भादवी सहकलम ४, पोक्सो चा पी.सी.आर. मधील आरोपी नामे सागर श्रीपतराव ठाकरे वय २४ वर्षे, रा. खंबीत ता. आष्टी जि. वर्धा हयाने गळफास घेवून आत्महत्या केल्याचे दिसून आले. वरुन तात्काळ डी.ओ. पोउपनि गजानन काठेवाड यांना माहिती देण्यात आली. पोउपनि गजानन काठेवाड यांनी पो.स्टे. ला लॉकअप मध्ये पाहून इतर वरिष्ठ अधिकारी यांना सदरची माहिती दिली. **सदर आत्महत्येची घटना तुमचा सकाळी ०६.०० ते ०८.०० वा. पावेतो संत्री पहारा सुरु असतांना घडलेली आहे.**

**तसेच पोलीस अधिक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांनी केलेल्या चौकशी मध्ये तुमचा खालील प्रमाणे कसूर निष्पन्न झाला आहे.**

तुम्ही लॉकअप गार्ड पहारेकरी म्हणून दिनांक १९/०८/२०२१ रोजी सकाळी ०६/.०० ते ०८.०० वा. दरम्यान लॉकअप संत्री पहारा डयुटी असतांना संत्री पहारा डयुटी बजावित आरोपी यांचे लॉकअप गेट जवळ बसले नाही. आरोपीतांवर बारकाईने लक्ष ठेवले नाही. तसेच पहारा डयुटी असतांना ती सोडून नैसर्गिक विधी करीता कोणालाही न सांगता व आरोपी लॉकअपचा इतर कुणाला चार्ज न देता निघून गेले त्यामुळे मयत आरोपी यास लॉकअप गेटला गळफास लावून घेण्यास वेळ मिळाला.

तुमच्या अशा कर्तव्यातील बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा विभागीय चौकशी मध्ये कसूर सिध्द झ ााल्याने **तसेच अपर पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र पोमस/११-अ/२२/०८/कसूरी/पोउनि काठेवाडे व इतर २ /३५/२०२२ मुंबई दि. ०७/०३/२०२२ अन्वये सुचीत केल्याप्रमाणे मा. पोलीस आयुक्त, अमरावती शहर हे शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत असे कळविल्याने** आम्ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम २५ नुसार महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम १९५६ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार आम्हास प्रदान असलेल्या अधिकारान्वये सक्षम प्राधिकारी म्हणून तुम्हास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम २५ (२) तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम १९५६ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार **नवप्रविष्ठ पोलीस शिपाई च्या मुळ पदावर (दोन) २ वर्षाकरीता का ? ठेवण्यात येवू नये या शिक्षेबाबत** कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदरची नोटीस तुम्ही दिनांक

३१/३/२०२२ रोजी स्विकारुन त्यावर स्पष्टीकरण सादर केले. सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे बारकाईने अवलोकन केले असता ते समाधानकारक वाटले नसल्याने तुम्हास दिनांक ०२/०६/२०२२ रोजी आज्ञांकित कक्षेत बोलावून तुमचे सविस्तर म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तुमचे मौखीक म्हणणे तसेच तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा सखोल विचार केला असता ते समाधानकारक वाटले नाही. करीता तुम्हास कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी तुम्ही पोशि/१६१४ प्रशांत इंगोले पो.स्टे. राजापेठ अमरावती, शहर. यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम २५ (२) तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम १९५६ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार **नवप्रविष्ठ पोलीस शिपाई च्या मुळ पदावर (दोन) २ वर्षाकरीता ठेवण्याची शिक्षा देण्यात येत आहे.** तसेच तुमचा दिनांक २०/०८/२०२१ ते २९/११/२०२१ पर्यतचा निलंबन कालावधी हा **जसाचे तसा** करण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

**३ . पोआअ/पशा-३/प्र.अ.पदो.हजर/६२११/२०२२.अमरावती शहर दि.०६/०६/०२२.**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पदोन्नती आदेश क्र. पोमसं/८-अ/ प्र.अ.पदो./ का.अ.निवडसुची/२०२१-२२/१२३/२०२१ दि.२८.०४.२०२२ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमुद कार्यालय अधिक्षक यांना पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर प्रशासकीय अधिकारी राजपत्रित (गट-ब) पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | प्रशासकीय अधिकारी यांचे नाव | पुर्वीचे नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील पदस्थापना कार्यालय |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. किशोर लक्ष्मणराव शेंडे | पोलीस अधिक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण | पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर |

श्री. किशोर लक्ष्मणराव शेंड, कार्यालय अधिक्षक यांना पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण यांचे आदेश क्रमांक/पोअअग्रा/पशा-७/पदोन्नती/का.अ. ते प्र.अ./५७५९/२०२२ दि.३१.०५.२०२२ अन्वये दिनांक ३१.०५.२०२२ चे मा.नंतर पासुन प्रशासकीय अधिकारी या पदोन्नतीचे पदावर बदलीचे ठिकाणी रुजु होण्यास कार्यमुक्त करण्यांत आले आहे. श्री. किशोर

लक्ष्मणराव शेंडे, कार्यालय अधिक्षक हे दि. ०२.०६.२०२२ रोजी म.पुर्व प्रशासकीय अधिकारी पदावर या कार्यालयाचे आस्थापनेवर हजर झालेले असुन श्री. किशोर लक्ष्मणराव शेंडे यांना दि. ०२.०६.२०२२ रोजी म.पुर्व प्रशासकीय अधिकारी या पदावर हजर करुन घेण्यांत येत आहे.

**( किशोर शेंडे )**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रती, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष